Literacy for a Billion

Movie: Devi karlyachi Ekvira
Year: 2009

Song: Kolyanchi aai karle gavanchi
Lyricist:

कोल्यांची आई कार्ले गावांची
एकविरा आय
कोल्यांची आई कार्ले गावांची
एकविरा आय
वाऱ्यानं आमची होरी गेली
वादळ झायलं दर्याला
कोल्यांची आई कार्ले गावांची
एकविरा आय
कोल्यांची आई

चला जाऊया मिलून सारेजण
पुंजा करूया आपले एकइरा आईचे
मिलो तट माझे .........
दर्या खवलला सुटला तुफानी वारा
नाय गाठीला अजून ...... किनारा
नाय गाठीला अजून ...... किनारा
जीव माझा धकधक करतीया
आज बंदराला
कोल्यांची आई कार्ले गावांची
एकविरा आय
कोल्यांची आई

आई तुला नवस काय काय बोलू
देन कोंबऱ्यां बकऱ्यांचा मानू
फिरेन बोललेला नवस तुला
येऊन दे धनी घराला

नको दाखवू काली दीवाली आम्हांला
नको दाखवू काली दीवाली आम्हांला
डोंगरांशी नजर फिरवून
शांत कर गं दर्याला
कोल्यांची आई कार्ले गावांची
एकविरा
कोल्यांची आई

धनी माझा आयला बंदराला
बघून त्याची होरी आनंद झायला
पावली एकविरा आमचे नवसाला
इन दोऱ्याशी काल्र्याला
आईची वटी गं भराला
सुखी ठेवी गं आमचे पोरा बालांना
सुखी ठेवी गं आमचे पोरा बालांना
मान तिनी राखीलाय गं
आज माझे कुंकवाचा
दर्यान् पावली
आमचे माता एकविरा
दर्यान् पावली

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*